मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आमदार रोहित पवार यांच्या चौकशीचा पिंपरीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून तीव्र विरोध

## राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी थेट रस्त्यावर उतरुन निषेध केला

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार रोहित पवार यांच्या ईडीमार्फत होणाऱ्या चौकशीच्या विरोधात पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी थेट रस्त्यावर उतरुन निषेध केला. पिंपरी येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात दोन तास ठिय्या मांडून या चौकशीप्रकरणी सरकारविरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक गट फुटून सरकारमध्ये सामील झाला असला तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते आणि




पदाधिकारी हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासोबत लढत आहेत आणि त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे आमदार रोहित पवार हे आहे. ते आपले आजोबा शरद पवार यांच्या बाजूने खंबीरपणे उभे आहेत. शिव-फुले-शाहू-आंबेडकरांची पुरोगामी विचारधारा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निष्ठा ठेवून त्यांनी फुटीर गटाविरोधात राज्यभरात रान पेटवले आहे आणि राज्यातील सामान्य नागरीक, विद्यार्थी, युवा, शेतकरी, महिला यांच्या मुद्द्यांवरही ते सरकारला कोंडीत पकडण्याचे काम करत आहेत. केवळ आपल्या मतदारसंघापुरतेच मुद्दे ते मांडत नाहीत तर राज्यातील विविध घटकांचे मुद्दे ते आक्रमकपणे मांडत आहेत. आमदार म्हणून विधानसभेत आणि रस्त्यावरची लढाईही आमदार रोहित पवार हे लढत असल्याचे दिसते. राज्यातील युवांच्या प्रश्नावर नुकतीच त्यांनी पुणे ते नागपूर अशी तब्बल ८०० कि.मी. हून अधिक लांबीची युवा संघर्ष यात्रा काढून त्याकडे सरकारचे लक्ष वेधलेच पण सोबतच शेतकरी, महिला, कामगार, बेरोजगार यांचे मुद्देही आक्रमकपणे मांडले. युवा संघर्ष यात्रेच्या समारोपाला तर त्यांचा आक्रमकपणा आणि त्यांना मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद संपूर्ण राज्याला बघायला मिळाला. पक्षातील पहिल्या फळीतील अनेक नेते सत्तेत सहभागी झाले असले तरी आमदार रोहित पवार हे न डगमगता राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या गटाची भूमिका ठामपणे आणि मुद्देसूदपणे मांडत आहेत. यामुळेच घाबरलेल्या सरकारने त्यांच्या मागे आता चौकशीचा ससेमिरा लावला आहे. यापूर्वी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारवाईचा बडगा उगारून पाहिला तरी आमदार रोहित पवार यांनी या कारवाईला जुमानले नाही. त्यानंतर युवा संघर्ष यात्रा काढून राज्यभर सरकारविरोधात वातावरणनिर्मिती केली. त्यामुळेच लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या या युवा नेत्याला रोखण्यासाठी सरकारकडून सूडाची कारवाई केली जात असून ईडीच्या चौकशीचा ससेमिरा त्यांच्यामागे लावल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. लोकशाहीमध्ये लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या नेत्याविरोधात कारवाई केली जात असेल आणि त्याचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला जात असेल तर ते धोकादायक आहे.

# घर चलो अभियान धुमधडाक्यात राबविण्याचा संकल्प

## आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू झाली आहे. निवडणुकीपूर्वी शहरातील प्रत्येक नागरिकांपर्यंत केंद्र व राज्य या दोन्ही सरकारने केलेली कामे पोहोचवण्यासाठी शहर भाजपने कंबर कसली आहे. त्यानुसार शहरात घर चलो अभियान राबविण्यात येणार असून, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील तीनही मंडलांतर्गत येणाऱ्या ५२८ बुथ कार्यकर्त्यांचे गुरूवारी रहाटणीत संमेलन घेण्यात आले. त्यामध्ये या अभियानाबाबत प्रशिक्षण देऊन बुथ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. देशात सेवा, सुशासन आणि गरीबांचे कल्याण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने राबवलेल्या योजना, त्या योजनांचा प्रत्यक्षात जनतेला झालेला लाभ नागरिकांपर्यंत धुमधडाक्यात पोहोचवण्याचे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी या संमेलनात केले.हाटणी येथील विमल गार्डन बँक्वेट हॉल येथे हे संमेलन दोन सत्रामध्ये पार पडले. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, घर चलो अभियानाचे संयोजक विलास मडिगेरी, चिंचवड विधानसभा संयोजक सिद्धेश्वर बारणे, सरचिटणीस नामदेव ढाके, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सांगवी-रहाटणी मंडल अध्यक्ष संदिप नखाते, वाकड-थेरगाव मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, रावेत-काळेवाडी सोमनाथ भोंडवे, विधानसभा प्रमुख काळूराम बारणे यांच्यासह ५२८ बुथ कार्यकर्ते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने २०१४ ते २०२४ या दहा वर्षांच्या काळात देशाच्या सर्वच क्षेत्रात प्रचंड गतीने विकास केला आहे. गरीब कल्याण, महिला सशक्तीकरण, देशांतर्गत व बाह्य सुरक्षा अशा अनेक क्षेत्रात मोदी सरकारने मोठी कामगिरी करून आंतरराष्ट्रीय पातळीवरही देशाचे नाव उंचावले आहे. त्याचप्रमाणे देशातील भाजपशासित राज्यांनीही आपापल्या राज्यात मोठा विकास केला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जात असताना केंद्र व राज्य सरकारांची हीच विकासाची गाथा तळागाळापर्यंत सांगण्यासाठी भाजप सज्ज झाली आहे. त्यातून लोकसभा निवडणुकीत जनतेचा विश्वास जिंकण्याचा भाजपचा इरादा आहे. त्यासाठी भाजपने ग्रामीण भागात गाव चलो अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

# पिंपरी महापालिकेच्या ‘या’ रुग्णालयांच्या परिसरात मिळणार स्वस्त दरामध्ये औषधे!

## स्वस्त दरामध्ये रुग्णालय परिसरातच औषधे मिळण्याची सुविधा उपलब्ध

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिकेच्या वायसीएम, नवीन थेरगाव, आकुर्डी, नवीन जिजामाता, नवीन भोसरी या पाच रुग्णालयांच्या परिसरात जेनेरिक औषधांची दुकाने सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला आता स्वस्त दरामध्ये रुग्णालय परिसरातच औषधे मिळण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेचे ३२ दवाखाने आणि आठ मोठी रुग्णालये आहेत. संत तुकारामनगर येथे महापालिकेचे ७५० खाटांचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय



आहे. पुणे जिल्ह्यातील नागरिक उपचारासाठी महापालिकेच्या रुग्णालयात येतात. अनेकदा रुग्णांना आवश्यक असणारी औषधे महापालिका रुग्णालयात उपलब्ध नसतात. त्यामुळे नाइलाजाने खासगी दुकानामधून औषधे आणावी लागतात. औषधे महागडी असतात. त्यामुळे महापालिकेच्या पाच रुग्णालय परिसरात जेनेरिक औषधांची दुकाने सुरू केली जाणार आहेत.नॅकोफ इंडिया लिमिटेड या कंपनीला महापालिका रुग्णालय परिसरात अमृत स्टोअर्सच्या धर्तीवर जेनेरिक औषधांचे दुकान सुरू करण्यासाठी थेट पद्धतीने भाडेतत्त्वावर जागा उपलब्ध करून देणार आहे. कंपनीला १५० ते १८६ चौरस फूट क्षेत्रफळाचे पाच गाळे दरमहा ३२ हजार २४२ रुपये भाडेदराने दहा वर्षांसाठी देण्यात आले आहेत.केंद्र शासनाच्या आयुष्मान भव मोहिमेंतर्गत शहरातील १८ वर्षे व त्यावरील सर्व पुरुषांची आरोग्य तपासणी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह सर्व रुग्णालये व दवाखान्यांत मोफत करण्यात येतात. बाह्यरुग्ण विभागातील (ओपीडी) सर्व केस पेपर, औषधोपचार व तपासण्या विनामूल्य करण्यात येत आहेत. याची मुदत १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२३ अशी होती. मुदत संपल्याने ३१ मार्च २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे.महापालिकेच्या वायसीएम, नवीन थेरगाव, आकुर्डी, नवीन जिजामाता, नवीन भोसरी या पाच रुग्णालयांच्या परिसरात जेनेरिक औषधांची दुकाने सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला आता स्वस्त दरामध्ये रुग्णालय परिसरातच औषधे मिळण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेचे ३२ दवाखाने आणि आठ मोठी रुग्णालये आहेत. संत तुकारामनगर येथे महापालिकेचे ७५० खाटांचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आहे. पुणे जिल्ह्यातील नागरिक उपचारासाठी महापालिकेच्या रुग्णालयात येतात. अनेकदा रुग्णांना आवश्यक असणारी औषधे महापालिका रुग्णालयात उपलब्ध नसतात. त्यामुळे नाइलाजाने खासगी दुकानामधून औषधे आणावी लागतात. औषधे महागडी असतात.

# टाळगाव चिखली गावाला ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा..!

## पायाभूत सोयी-सुविधा होणार सक्षम; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वारकरी संप्रदायाचे मुख्य तीर्थस्थान श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीच्या मधोमध वसलेले टाळगाव चिखली गावाला आता ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या गावातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.मौजे टाळगाव चिखलीला ‘क’ वर्ग पर्यटन




स्थळाचा दर्जा देण्याबाबत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वात दि. १९ मे २०२३ रोजी झालेल्या पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत तशी घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्राद्वारे कळवले आहे.आमदार महेश लांडगे म्हणाले की, ‘‘जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठगमन झाले. त्यावेळी त्यांचे टाळ चिखली येथे पडले होते’’ त्यामुळे गावाला टाळगाव चिखली असे नाव पडले, अशी सांगितली जाते. त्या घटनेचे साक्षीदार असलेले टाळ मंदिर आजही गावात आहे. तसेच महाराजांच्या १४ टाळकऱ्यांपैकी एक टाळकरी चिखली गावातील होते. इंद्रायणी नदीकाठी वसलेल्या गावाला चोहोबाजूने तटबंदी होती. ग्वाल्हेरचे देवराम कृष्णराव जाधवराव यांची गढी आहे. त्यामुळे गावाला धार्मिक, ऐतिहासिक आणि वारकरी संप्रदायाचा वारसा लाभला आहे.महाराष्ट्रातील पहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ उभारण्यात आले आहे. चिखलीगाव, जाधववाडी, कुदळवाडी, मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, पवार वस्ती, हरगुडेवस्ती या संपूर्ण भागाचा गावात समावेश आहे. १९९७ मध्ये पिंपरी-गावाचा समावेश झाला असून, २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टी च्या सत्ताकाळात चिखली आणि परिसरात प्रलंबित विकासकामांना गती देण्यात आली आहे. आता ‘क’ वर्ग पर्यटनस्थळाचा मिळाल्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा आणखी सक्षम करण्यास मदत होणार आहे.

# मराठा सर्वेक्षणाला मुदतवाढ नाही

## २ फेब्रुवारीला रात्री बारा वाजता सर्वेक्षणाची संगणकप्रणाली बंद

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाची वाढवून दिलेली मुदत शुक्रवारी (२ फेब्रुवारी) संपत आहे. मात्र, राज्यातील बहुतांश भागात सर्वेक्षणाचे बरेचसे काम प्रलंबित आहे. तरीदेखील सर्वेक्षणाला मुदतवाढ मिळणार नसल्याचे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने बुधवारी रात्री स्पष्ट केले. त्यानुसार २ फेब्रुवारीला रात्री बारा वाजता सर्वेक्षणाची संगणकप्रणाली बंद करण्यात येणार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी राज्यभरातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे गुरुवारी बैठक घेतली. या बैठकीत सर्वेक्षणाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये राज्यातील ग्रामीण भागात सर्वेक्षण सरासरी ७० टक्क्यांच्या आसपास झाले आहे. मात्र, शहरी भागात सर्वेक्षण कमी झाले आहे. परिणामी महापालिका आयुक्तांनी सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याची




मागणी केली. शनिवार-रविवार सुटीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना कामाला लावून सर्वेक्षण पूर्ण करता येईल, असे बैठकीत एकमताने सांगण्यात आले. त्यानुसार राज्य शासनाच्या वतीने मागासवर्ग आयोगाला मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, ही विनंती फेटाळण्यात आली.राज्य मागासवर्ग आयोगाच्या सचिव आ. उ. पाटील यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये आयोगाने २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सर्वेक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्वेक्षणासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही, तरी मुदतवाढीची मागणी करू नये. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी (२३:५९) सर्वेक्षणाची संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन) बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्याबाबत प्रगणकांना सूचना देण्यात याव्यात आणि ३ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयोगाकडे सादर करण्यात यावे, असे नमूद केले आहे. या पत्राची प्रत मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आणि सर्व विभागीय आयुक्त यांनाही पाठविण्यात आली आहे.सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी राज्यभरातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे गुरुवारी बैठक घेतली. या बैठकीत सर्वेक्षणाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये राज्यातील ग्रामीण भागात सर्वेक्षण सरासरी ७० टक्क्यांच्या आसपास झाले आहे. मात्र, शहरी भागात सर्वेक्षण कमी झाले आहे. परिणामी महापालिका आयुक्तांनी सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याची मागणी केली. शनिवार-रविवार सुटीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना कामाला लावून सर्वेक्षण पूर्ण करता येईल, असे बैठकीत एकमताने सांगण्यात आले. त्यानुसार

### सर्वेक्षणाचे बरेचसे काम प्रलंबित

**» सर्वेक्षणासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही, तरी मुदतवाढीची मागणी करू नये. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी (२३:५९) सर्वेक्षणाची संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन) बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्याबाबत प्रगणकांना सूचना देण्यात याव्यात आणि ३ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयोगाकडे सादर करण्यात यावे, असे नमूद केले आहे. या पत्राची प्रत मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आणि सर्व विभागीय आयुक्त यांनाही पाठविण्यात आली आहे.मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाची वाढवून दिलेली मुदत शुक्रवारी (२ फेब्रुवारी) संपत आहे. मात्र, राज्यातील बहुतांश भागात सर्वेक्षणाचे बरेचसे काम प्रलंबित आहे.**

राज्य शासनाच्या वतीने मागासवर्ग आयोगाला मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, ही विनंती फेटाळण्यात आली.राज्य मागासवर्ग आयोगाच्या सचिव आ. उ. पाटील यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये आयोगाने २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सर्वेक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. तरी मुदतवाढीची मागणी करू नये. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी (२३:५९) सर्वेक्षणाची संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन) बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्याबाबत प्रगणकांना सूचना देण्यात याव्यात आणि ३ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयोगाकडे सादर करण्यात यावे.

# विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा अंदाज

## प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती सक्रिय

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती फेब्रुवारी महिन्यांतही सक्रिय राहण्याचा अंदाज आहे. मात्र, फेब्रुवारीनंतर एल-निनोची स्थिती हळूहळू कमजोर पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे.भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात एल-निनोची स्थिती कायम आहे. तेथील समुद्रातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्तच आहे. फेब्रुवारीअखेरपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारीनंतर एल-निनो स्थिती हळूहळू कमजोर पडण्याचा अंदाज आहे. तसे झाल्यास यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे. तसेच हिंदी महासागरातील द्वि-धुव्रिताही सध्या सक्रिय आहे. पुढील



एक दोन महिन्यांत ही स्थिती तटस्थ अवस्थेत पोहचण्याची शक्यता आहे.फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरी २२.७ मिमी पाऊस पडतो, सरासरीच्या तुलनेत ११९ टक्के पावसाचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मागील वर्षभर किमान तापमान सरासरीपेक्षा जास्तच राहिले होते. जानेवारी महिन्यात किमान तापमान सरासरीपेक्षा एक ते तीन अंश सेल्सिअसने जास्तच राहिले आहे. फेब्रुवारी महिन्यातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमान देशभरात जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्यात मुंबई, किनारपट्टी वगळता कमाल तापमान सरासरी इतकेच राहण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात उत्तर भारतात थंडीची लाट येण्याची शक्यता कमीच आहे.जानेवारी महिन्यांत देशभरात सरासरी ७.२ मिमी पाऊस पडला आहे. १९०१ ते २०२४ या काळातील नवव्या क्रमांकाचा सर्वांत कमी पाऊस झाला आहे. जानेवारी महिन्यांत देशात सरासरी १७.१ मिमी पाऊस पडतो. विभागनिहाय विचार करता उत्तर भारतात सरासरी ३३.८ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात फक्त ३.१ मिमी पाऊस पडला. ईशान्य भारतात सरासरी १७.२ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ५.६ मिमी पाऊस झाला.

# सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास आता ५०० रुपये दंड!

## घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या या प्रस्तावाला स्थायी समितीची मान्यता

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सार्वजनिक ठिकाणी, पदपथ आणि रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्यांकडून आता ५०० रुपये दंड आकारण्यात येणार आहे. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली असून त्याची तातडीने अंमलबजावणी सुरू झाली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने तशी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केली आहे. दंडाच्या रकमेत वाढ केल्याने सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे



प्रकार थांबतील, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी, पदपथ आणि रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्यांना जरब बसावी, यासाठी दंडाची रक्कम वाढविण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने तयार केला आहे. हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्याला स्थायी समितीच्या बैठकीत आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंजुरी दिली आहे.

सार्वजनिक ठिकाणी, पदपथांवर, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांविरोधात महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जाते. उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना यापूर्वीच्या नियमानुसार १८० रुपयांचा दंड आकारला जात होता. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, लघुशंका करणे, थुंकणे, कचऱ्याचे वर्गीकरण न करणे, कचरा जाळणे, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर, ओला कचरा जिरविण्यासाठी बल्क वेस्ट यंत्रणा कार्यान्वित न ठेवणे आदींसाठी हा दंड केला जात होता. दंडाची रक्कम पूर्वी शासन मान्यतेने निश्चित करण्यात आली आहे. त्यात कालानुरूप वाढ झालेली नव्हती. त्यामुळे दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली असून, यापुढे १८० रुपयांऐवजी ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. दंडाची रक्कम कमी असल्याने उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांचे प्रमाण वाढत असून, त्यांना जरब बसत नाही. कचरा टाकताना सापडल्यास १८० रुपये भरून नागरिक मोकळे होत होते. त्यामुळे दंड रक्कम वाढत असली, तरी शहर अस्वच्छ राहण्याचे प्रमाण कायम राहत होते. आता दंड रकमेत वाढ केल्याने त्याला आळा बसेल, असा दावा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी केला आहे. सार्वजनिक ठिकाणी, पदपथ आणि रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्यांकडून आता ५०० रुपये दंड आकारण्यात येणार आहे.

# खासगी कार्यालयात सरकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती रद्द करावी

## तानाजी सावंतांच्या खासगी कार्यालयात दिमतीला सरकारी कर्मचारी?

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सार्वजनिक आरोग्य विभागातील दोन कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या कात्रज येथील खासगी कार्यालयात पाठविण्यात आले आहे. या नियुक्तीला आक्षेप घेऊन ती खासगी कामासाठी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर आरोग्य विभागाने ही नियुक्ती सरकारी कामासाठीच असल्याचा दावा केला आहे.आरोग्यमंत्री सावंत यांचे कात्रज येथे खासगी कार्यालय आहे. या कार्यालयात सफाई कामगार राजू दादू सोलंकी आणि सेवक अमोल शंकर माने यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला. या निर्णयाला आक्षेप घेण्यात आला आहे. आरोग्यमंत्र्यांच्या खासगी कार्यालयात सरकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती रद्द करावी, अशी मागणीही आरोग्य हक्क



कार्यकर्ता दीपक जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.यावर सार्वजनिक आरोग्य विभागाने खुलासा करीत ही नियुक्ती सरकारी कामासाठीच असल्याचे स्पष्ट केले आहे. आरोग्य विभागाने म्हटले आहे की, आरोग्य मंत्र्यांच्या कात्रज येथील कार्यालयात वैद्यकीय मदत कक्ष सुरू असून त्या ठिकाणी दोन विशेष कार्यकारी अधिकारी काम करीत आहेत. त्यांच्या मदतीला दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे विभागात आतापर्यंत २० महाआरोग्य शिबिरे घेण्यात आली असून, त्याचे नियोजन या वैद्यकीय मदत कक्षातून झाले आहे. या शिबिरांमध्ये सुमारे वीस लाख रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. गंभीर आजार, शस्त्रक्रियेची आवश्यकता अथवा सरकारी रुग्णालयात उपचार होऊ न शकणाऱ्या रुग्णांना मदत करण्याचे काम या कक्षाच्या माध्यमातून होते.

मुख्यमंत्री सहायता कक्ष, धर्मादाय आयुक्त कार्यालयांतर्गतची रुग्णालये व इतर संस्थांच्या माध्यमातून रुग्णांना मदत मिळवून दिली जाते. या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना मदत करून त्यांचे प्राण वाचविण्यात आले आहेत. या कक्षात दोन विशेष कार्यकारी अधिकारी आणि कर्मचारी काम करतात. तिथे दररोज सुमारे दीडशे रुग्ण येतात आणि तिथे त्यांना मदत केली जाते, असेही आरोग्य विभागाने नमूद केले आहे.